**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

ॲड. आबासाहेब गोपाळराव पाटील
मु.पो.खामगाव, ता.बार्शी,
जि.सोलापूर

अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.२, सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता,**
सार्वजनिक बांधकाम उप विभाग, बार्शी,
जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९३६/२००९/सोलापूर+१९३७/२००९/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ८/०४/२०१०, १७/०४/२०१० |
| ३ | **उपस्थिती**<br>**जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता,**<br>सार्वजनिक बांधकाम, उप विभाग, बार्शी, जि.सोलापूर<br>श्रीमती सुनिता पाटील<br>**अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**<br>सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.२, सोलापूर<br>श्री.एस.एस.माने | |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २०/०६/२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १७/०८/२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ११/०९/२००९ |
| ७ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-**<br>१) बार्शी-सोलापूर रस्त्यावरील साखळी क्र. २३/६०० मधील पुलाच्या दुरुस्तीच्या कामाचे अंदाजपत्रक, निविदा, मोजमाप नोंदवही व अदा केलेल्या देयकाच्या छायाप्रती | |

| | |
|---|---|
| | २) माढा-वैराग-उस्मानाबाद रस्त्यावरील साखळी क्र.२३/९००.ते ३९/८०० मधील दुरुस्तीच्या कामाचे अंदाजपत्रक, निविदा, मोजमाप नोंदवही व अदा केलेल्या देयकाच्या छायाप्रती |

**विवेचन**

'मागितलेल्या माहितीच्या प्रती मला विनाशुल्क मिळालेल्या असून माहिती समाधानकारक आहे. माझी कुठल्याही प्रकाराची तक्रार नाही. माझी सर्व अपिले निकाली काढावी', असे अपीलकर्ता अडॅ. आबासाहेब गोपाळराव पाटील यांचे दि.५/४/२०१० रोजीचे निवेदन जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता,सार्वजनिक बांधकाम, उप विभाग, बार्शी श्रीमती सुनिता पाटील व अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.२, सोलापूर श्री.एस.एस.माने यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

दोन्ही अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 27 APR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.उमेश रविंद्र गवळी
मु.पो.झारगडवाडी, ता.बारामती, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा संचालक (प्रशासन),
साखर आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सह संचालक (प्रशासन),
साखर आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९३६ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.३.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा संचालक (प्रशासन),
साखर आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे श्री.डी.बी.गावीत

**जन माहिती अधिकारी** तथा सह संचालक (प्रशासन),
साखर आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे श्री.एस.डी.काकडे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१७.११.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२९.११.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.५.१.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१८.४.२००९ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२६.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. सदर दिवशी सर्व संबंधित गैरहजर असल्याने पुन्हा दिनांक २५.२.२००९ रोजी झालेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश करण्यात आला. त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर राहिल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.१०.३.२०१० रोजी घेण्यात आली.

अपीलकर्ता श्री.उमेश रविंद्र गवळी यांनी मागितलेल्या दोन मुद्दयातील उपलब्ध माहिती दिली. तांत्रिक कारणांमुळे साखर कारखाना बंद राहिल्यास ऊस तोडणी व वाहतूक कामगारांना द्यावयाच्या वेतनाबाबतची माहिती कामगार आयुक्तांकडून घ्यावी; असे कळविले, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहसंचालक(प्रशासन), साखर आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे श्री.एस.डी.काकडे यांनी केले. माहिती पूर्ण मिळाली नाही. तसेच पुढील अपील कोणाकडे करावयाचे याबाबत उत्तरात उल्लेख केला गेला नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.गवळी यांनी लेखी निवेदनात केली.

जन माहिती अधिकाऱ्यांनी त्यांच्याकडील माहिती अपीलकर्त्यास दिली आहे. तथापि अन्य मुद्दयांसाठी अर्ज संबंधित जन माहिती अधिकाऱ्याकडे वर्ग करावयास हवा होता. तसेच जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्या उत्तरात / निर्णयात पुढील अपील कोणाकडे करावे याबाबतचा स्पष्ट उल्लेख संबंधितांच्या पत्त्यासह करणे आवश्यक आहे, याची समज त्यांना देण्यात येत आहे.

अपीलकर्त्याच्या अर्जातील मुद्दा क्र.१ ची माहिती कामगार आयुक्तालयाकडून प्राप्त करून घेऊन जन माहिती अधिकारी तथा सहसंचालक(प्रशासन), साखर आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी अपीलकर्त्यास नि:शुल्क पुरवावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अमान्य करण्यात येत आहे.

(२) आयोगाने दिलेल्या मौखिक आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा सहसंचालक(प्रशासन), साखर आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दि.१५.५.२०१० पर्यंत आयोगाला सादर करावा.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ.

पुणे
दि.२७.४.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.गोपाळ बाळकृष्ण क्षीरसागर
तेलीगल्ली, गणपती मंदिराजवळ, इंदापूर, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख,
इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, पुणे जिल्हा,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९४३ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.११.३.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख,
इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे श्री.बा.वा.वानखेडे

**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, पुणे जिल्हा,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे श्री.एन.एम.झांबरे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२२.११.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.११.१.२२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.७.१.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१८.१.२००८ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२५.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.११.३.२०१० रोजी घेण्यात आली.

अपीलकर्ता श्री.गोपाळ बाळकृष्ण क्षीरसागर यांनी मिळकतीला झालेल्या नोंदींबाबतची माहिती जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे यांच्याकडे मागितली होती. मूळ प्रकरण १९९४ चे असून त्यावेळी अभिलेखात आढळत नव्हते. तसे अपीलकर्त्यास विहित मुदतीत कळविले होते. या कागदपत्रांचा शोध घेण्यात येत होता व ती उपलब्ध झाल्यानंतर अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या आदेशानुसार नि:शुल्क घेऊन जाण्यास अपीलकर्त्यास कळविले. परंतु अपीलकर्त्याने संपर्क साधलेला नाही. मात्र मिळकतीवरील खरेदीपत्रानुसार झालेल्या नोंदी रद्द करण्याची मागणी त्यांनी केली असून ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम, २०५ अंतर्गत येत नाही. त्यासाठी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ अन्वये दाद मागणे आवश्यक असल्याचे त्यांना कळविण्यात आले, असे अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, जिल्हा निरीक्षक, भूमी अभिलेख, पुणे, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे श्री.बा.वा.वानखेडे यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले. त्यानी केलेली कार्यवाही रास्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**पुणे**
**दि.२६.४.२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. मनोज महादेव जाधव
खानापूर गारगोटी, ता. भुदरगड, जि. कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी,
(ग्रामपंचायत), जिल्हा परिषद, कोल्हापूर, जि. कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्य लेखा (वित्त) अधिकारी
जिल्हा परिषद, कोल्हापूर, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९४४ /२००९ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ७.४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. मनोज महादेव जाधव
खानापूर गारगोटी, ता. भुदरगड, जि. कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी,
(ग्रामपंचायत), जिल्हा परिषद, कोल्हापूर, जि. कोल्हापूर
श्री. एम. व्ही. चौगुले

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्य लेखा (वित्त) अधिकारी
जिल्हा परिषद, कोल्हापूर, जि. कोल्हापूर श्री. ग. बा. पाटील

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २४.२.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २०.१०.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १५.७.२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३१.१०.२००९ |
| ६ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

गारगोटी ग्रामपंचायतीने दुकान गाळा धारकांकडून जमा केलेल्या रकमांच्या विनियोगाबाबत शहानिशा करुन वस्तुस्थितीचे प्रमाणपत्र द्यावे, अशी मागणी आपण जन माहिती अधिकारी तथा मुख्य लेखा (वित्त) अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांच्याकडे केली होती. त्यांनी परिपूर्ण माहिती दिली नाही तसेच जमा केलेल्या रकमांची योग्य नोंद, व्याज मिळण्यासाठी योग्य ती कार्यवाही केलेली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. मनोज महादेव जाधव यांनी केली.

आवश्यक त्या स्पष्टीकरणासह सर्व माहिती अपीलकर्त्यास देण्यात आली असल्याचे जन माहिती अधिकारी तथा मुख्य लेखा (वित्त ) अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर श्री. एम. व्ही. चौगुले यांनी नमूद केले.

ग्रामपंचायती संदर्भातील माहिती असून जिल्हा परिषदेच्या मुख्य लेखा व (वित्त) अधिकाऱ्यांकडे अपीलकर्त्याने अर्ज केला. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर हे प्रथम अपिलीय प्राधिकारी नसून प्रथम अपील त्यांच्याकडे केले, ते मुदतीत नव्हते. माहितीची शहानिशा करुन संबंधित कागदपत्रांची पडताळणी करुन प्रमाणपत्र देण्याची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. तसा निर्णय आपण दिला आहे, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर श्री. एम. व्ही. चौगुले यांनी केले. जन माहिती अधिकारी तथा मुख्य लेखा (वित्त ) अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर श्री. ग. बा. पाटील व अपिलीय प्राधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर श्री. एम. व्ही. चौगुले यांनी केलेली कार्यवाही योग्य असून अपीलकर्त्याची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.** 28 APR 2010

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.भास्कर गणेश देशकर
सी-४, श्रीनिवास पार्क, आयडीबीआय बँकेसमोर, बाणेर रोड, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपनिबंधक,
सहकारी संस्था, पुणे शहर(४), पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९४४ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.३.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे प्रतिनिधी श्री.ए.ए.शेख

**जन माहिती अधिकारी** तथा उपनिबंधक,
सहकारी संस्था, पुणे शहर(४), पुणे श्री.एम.एस.जाधवर

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१६.१.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१६.२.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१०.३.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२५.४.२००८ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२६.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर राहिल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.१०.३.२०१० रोजी घेण्यात आली.

आपण ज्येष्ठ नागरिक असून (वय ९० वर्षे) जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेल्या उत्तराविरूध्द केलेल्या अपिलाचा निर्णय अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे यांनी विहित मुदतीत दिला नाही, म्हणून त्यांच्यावर कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.भास्कर गणेश देशकर यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात केली आहे.

श्री.देशकर यांना सर्व माहिती विहित मुदतीत देण्यात आली. दि.११.३.२००८ रोजी त्यांनी केलेल्या अपिलाचा निर्णय दि.२५.४.२००८ रोजी देण्यात आला, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे श्री.एम.एस.जाधवर यांनी केले.

अपीलकर्त्यास माहिती देण्यात आली आहे. 'चुकीची माहिती' म्हणून त्यांनी नमूद केलेले मुद्दे प्रशासकीय कार्यवाहीविषयीच्या आक्षेपाचे असून ते माहितीचा अधिकार अधिनियम, २००५

अंतर्गत येत नाहीत. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी जास्तीत जास्त ४५ दिवसात निर्णय देणे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५अन्वये बंधनकारक आहे, याची समज अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे श्री.सुनिल देशमुख यांना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २० .४.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. मनोज महादेव जाधव
खानापूर गारगोटी, ता. भुदरगड, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सरव्यवस्थापक,
कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.,कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा व्यवस्थापक,
कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, शाखा गारगोटी
गारगोटी (खानापूर), ता.भुदरगड, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११४५/ २००९ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ७.४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. मनोज महादेव जाधव
खानापूर गारगोटी, ता. भुदरगड, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा सरव्यवस्थापक,
कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.,कोल्हापूर तर्फे ॲड. पी.जे.वाघ

**जन माहिती अधिकारी** तथा व्यवस्थापक,
कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, शाखा गारगोटी
गारगोटी (खानापूर), ता.भुदरगड, जि. कोल्हापूर तर्फे ॲड. पी.जे.वाघ

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २५.११.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १०.१२.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ६.१.२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १०.१.२००९ |
| ६ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

गारगोटी ग्रामपंचायतीने घेतलेल्या दुकान गाळयांपोटी रकमा किती व कोणत्या खात्यात ठेवल्या आहेत, त्यावर व्याज का दिले जात नाही, अशा स्वरूपाची माहिती आपण मागितली होती. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला लागू नाही तसेच रिझर्व्ह बँकेच्या आदेशानुसार व बँकिग कायद्यानुसार एका खातेदाराची माहिती दुसऱ्या खातेदाराला दिली जात नाही, असे उत्तर जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक, कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, शाखा गारगोटी यांनी दिले. ते चुकीचे आहे, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. मनोज महादेव जाधव यांनी केले.

आपले उत्तर योग्य असल्याचे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक, कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, शाखा गारगोटी यांचे प्रतिनिधी श्री. आर. एस. मिठारी यांनी केले. कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू असल्याच्या अन्य अपिलातील आयोगाच्या आदेशाविरूध्द बँकेने उच्च न्यायालयात दावा दाखल केला असून उच्च न्यायालयाने आयोगाच्या आदेशास दि. १६.२.२०१० रोजी स्थगिती दिली आहे, असे श्री. मिठारी यांनी निदर्शनास आणले. ते लक्षात घेता उच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयानंतर पुढील कार्यवाही होऊ शकेल.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. 28 APR 2010

(राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ)

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.कन्हैयालाल मोतीलाल तालेरा
१४, मोतीलाल तालेरा रोड, पुणे

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपायुक्त (महसल),
आयुक्त कार्यालय, पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा चिटणीस, विभागीय आयुक्त,
पुणे विभाग, पुणे यांचे कार्यालय, विधान भवन, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११४८ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.११.३.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.कन्हैयालाल मोतीलाल तालेरा
१४, मोतीलाल तालेरा रोड, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपायुक्त (महसल),
आयुक्त कार्यालय, पुणे प्रतिनिधी श्री.शरद नाईक

**जन माहिती अधिकारी** तथा चिटणीस, विभागीय आयुक्त,
पुणे विभाग, पुणे यांचे कार्यालय, विधान भवन, पुणे श्री.शरद नाईक

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.६.२.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२५.२.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.३१.३.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१७.४.२००८ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२५.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.११.३.२०१० रोजी घेण्यात आली.

आपण मागितलेली माहिती आपल्याला मिळाली नसल्याची तक्रार अपीलकर्ता श्री.कन्हैयालाल मोतीलाल तालेरा यांनी केली.

ऑक्टोबर १९६० मधील एका वतन प्रकरणातील धारिकेच्या अवलोकनाची मागणी श्री.तालेरा यांनी केली होती. संबंधित संचिका अभिलेखात आढळत नसल्याचे त्यांना विहित मुदतीत कळविण्यात आले. संबंधित संचिका जिल्हाधिकारी, पुणे, भू-संपादन शाखा यांच्याकडील असून ती अवलोकनार्थ मिळण्याची मागणी श्री.तालेरा यांनी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'च्या वेळी केली. त्यानुसार विभागीय आयुक्त कार्यालयाकडून जिल्हाधिकारी, पुणे यांना कळविण्यात आले. जिल्हाधिकारी कार्यालयाने श्री.तालेरा यांनी या संचिका पाहण्यासाठी उपलब्ध असल्याचे कळविले. त्यांचे प्रतिनिधी श्री.ए.डी.गावडे यांनी संचिका पाहून १३९७ पानांच्या प्रती चलनाने शुल्क भरून दि.२९.३.२००८ रोजी प्राप्त करून घेतल्या, असे प्रतिपादन श्री.गावडे यांची पोच असलेल्या पत्राच्या प्रतीसह जन माहिती अधिकारी तथा चिटणीस, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे विभाग, पुणे श्री.शरद नाईक यांनी केले. मध्यंतरीच्या काळात आपण आजारी असल्यामुळे याची कल्पना आपल्याला नसल्याचे श्री.तालेरा यांनी सांगितले. परंतु त्यांचे हे समर्थन योग्य नाही. प्रती प्राप्त होऊन दोन वर्षे झाल्यानंतरही त्यांना याची कल्पना नसावी, दि.२९.३.२००८ रोजी प्रती

प्राप्त झालेल्या असताना दि.१६.५.२००८ रोजी त्यांनी आयोगाकडे अपील करावे, या बाबी आक्षेपार्ह असून सर्व यंत्रणांचा वेळ व कार्यशक्ती यांचा अपव्यय करणाऱ्या आहेत. त्याबाबत त्यांना समज देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२६.४.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. रमेश नारायण शिंदे
सर्व्हे नं. १०, जनता वसाहत,
श्रीतेज हौ. सो.समोर, डॉ.देशपांडे यांचेजवळ,
पुलाखाली,खोली नं.३,जनवाडी, पुणे-१६ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सह धर्मादाय आयुक्त,
धर्मादाय आयुक्त कार्यालय, ४२/२,
ढोले पाटील रोड, पुणे- ४११ ००१ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासन अधिकारी,
संचेती इन्स्टियूट फॉर आर्थोपेडिक्स अँड
रिहॅबिलीटेशन, १६, शिवाजीनगर, पुणे-५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९४९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | ११.३.२०१० |

३. **उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. रमेश नारायण शिंदे
सर्व्हे नं. १०, जनता वसाहत,
श्रीतेज हौ. सो.समोर, डॉ.देशपांडे यांचेजवळ,
पुलाखाली,खोली नं.३,जनवाडी, पुणे-१६

**अपिलीय प्राधिकारी** तथा सह धर्मादाय आयुक्त,
धर्मादाय आयुक्त कार्यालय, ४२/२,
ढोले पाटील रोड, पुणे- ४११ ००१ श्री. चंद्रकांत आ. पाटील, अधीक्षक

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासन अधिकारी,
संचेती इन्स्टियूट फॉर आर्थोपेडिक्स अँड
रिहॅबिलीटेशन, १६, शिवाजीनगर, पुणे-५ मिसेस अपर्ना एन. केळकर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १७.१०.२००७ ३.१.२००८, २५.३.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २६.१०.२००७ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १८.२.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

संचेती रिहॅबिलिटेशन हॉस्पिटल ट्रस्टच्या संदर्भातील आपण मागितलेली माहिती धर्मादाय आयुक्त कार्यालयाने दिली, परंतु टस्टने दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. रमेश नारायण शिंदे यांनी केली.

श्री. शिंदे यांनी सन १९७५ ते २००८ या काळातील माहिती मागितली आहे. सन २००० पासून आपल्या संस्थेला कोणतेही शासकीय अनुदान मिळत नाही. नियमानुसार धर्मादाय आयुक्तांना देण्यात येणारी माहिती वेळोवेळी सादर केली आहे. श्री. शिंदे सातत्याने संस्थेबाबत माहिती मागत असतात, तथापि मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने याचिका क्रमांक ५६६६/२००७ मध्ये दिलेल्या निर्णयानुसार आमच्या न्यासाला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही, असे लेखी व तोंडी प्रतिपादन संचेती इन्स्टिटयूट यांच्या प्रतिनिधी श्रीमती अपर्णा एन. केळकर यांनी केले.

उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचा निर्णय लक्षात घेता संस्थेस माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत असल्याचे पुरावे अपीलकर्त्याने देणे आवश्यक आहे. निवेदनात त्यांनी सन २००० पर्यंतच्या शासकीय अनुदानाचा व खाजगी संस्थांच्या अन्य देणग्या आदींचा उल्लेख केला आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ नुसार 'संस्था सार्वजनिक प्राधिकरण' ठरते हे सिध्द करणारे पुरावे त्यांनी दिलेले नाहीत. त्यामुळे त्यांचे अपील दाखलपात्र ठरत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

पुणे
दि. 29 APR 2010

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,** महाराष्ट्र राज्य, **पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५** कलम १९ (३) **अन्वये दाखल झालेले** अपील.

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

डॉ. कल्पना वांद्रेकर
इंग्रजी विभाग, नौरोसजी वाडिया महाविद्यालय,
१९, व्ही. के. जोग पथ, पुणे-१ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्राचार्य,
नौरोसजी वाडिया महाविद्यालय,
१९, व्ही. के. जोग पथ, पुणे-१ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी**
नौरोसजी वाडिया महाविद्यालय,
१९, व्ही. के. जोग पथ, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९५३ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | १०.३.२०१० |

५ **उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्राचार्य,
नौरोसजी वाडिया महाविद्यालय,
१९, व्ही. के. जोग पथ, पुणे-१ डॉ. बी. बी. ठाकूर

**जन माहिती अधिकारी**
नौरोसजी वाडिया महाविद्यालय,
१९, व्ही. के. जोग पथ, पुणे-१ श्री. सी. एस. निकाळजे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २.२.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ८.३.२००८ |
| ६ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्त्या डॉ. कल्पना वांद्रेकर यांनी मागितलेली माहिती सन १९९० ते १९९३ या काळातील व विस्तृत स्वरुपाची होती. माहिती संकलनात व टपाल पोहचण्यात असा एकूण ६ दिवसांचा विलंब झाला. वेळोवेळी त्यांना माहिती देण्यात आली असून आणखी कोणतीही माहिती हवी असल्यास देण्याची तयारी आहे. दीड वर्षापूर्वी त्या सेवानिवृत्त झाल्या आहेत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी श्री. सी. एस. निकाळजे व अपिलीय प्राधिकारी तथा प्राचार्य, नौरोसजी वाडिया महाविद्यालय, पुणे डॉ. बी. बी. ठाकूर यांनी केले. उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे, निवेदने व 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रातील नोंदी विचारात घेता ते मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. 20 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

सौ.सिंधू सोपान शिंदे
मु.पो. तांदूळवाडी, ता.कोरेगांव,
जि.सातारा

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार,**
कोरेगांव, ता.कोरेगांव, जि.सातारा

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा लिपिक,**
तहसील कार्यालय कोरेगांव, ता.कोरेगांव,
जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९५६/२००९/सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ९/०४/२०१० |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १४/०८/२००९ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १६/०९/२००९ |
| ५ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** मंडल अधिकारी यांनी दावा क्रमांक २४३ /९९ संदर्भात दिनांक ७/०९/२००६ रोजी घेतलेल्या जबाबाच्या साक्षांकित नकला | |

**विवेचन**

'मागितलेली माहिती तहसील कार्यालय, कोरेगांव यांच्याकडून प्राप्त झाल्याचे व कोणतीही तक्रार राहिली नसल्याचे' अपीलकर्त्या सौ सिंधू सोपान शिंदे यांनी दि.५/०४/२०१० च्या निवेदनाव्दारे राज्य माहिती आयोगास कळविले आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 9 APR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सत्वशील धैर्यशील शेळके
मु.पो.लोणंद, ता.खंडाळा, जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

(१) **अपिलीय प्राधिकारी** तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी,
सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद सातारा, जि.सातारा
(२) **अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती खंडाळा, ता.खंडाळा, जि.सातारा — उत्तरवादी

(१) **जन माहिती अधिकारी** तथा कक्ष अधिकारी,
सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद सातारा, जि.सातारा

(२) **जन माहिती अधिकारी** तथा कक्ष अधिकारी,
पंचायत समिती खंडाळा, ता.खंडाळा, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९६१ / २००९ /सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.९.४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सत्वशील धैर्यशील शेळके
मु.पो.लोणंद, ता.खंडाळा, जि.सातारा

(१)**अपिलीय प्राधिकारी** तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद सातारा, जि.सातारा प्रतिनिधी श्री.बी.सी.पंधरे

| | | |
|---|---|---|
| **(२)अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,<br>पंचायत समिती खंडाळा, ता.खंडाळा, जि.सातारा श्री.जी.बी.भोसले<br><br>**(१) जन माहिती अधिकारी** तथा कक्ष अधिकारी,<br>सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद सातारा, जि.सातारा श्री.बी.सी.पंधरे<br><br>**(२) जन माहिती अधिकारी** तथा कक्ष अधिकारी,<br>पंचायत समिती खंडाळा, ता.खंडाळा, जि.सातारा श्री.पी.डी.बोंबले | | |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२.११.२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१८.११.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२.१२.२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.४.१२.२००९ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

एका अधिकाऱ्याच्या संदर्भातील आपण मागितलेली महिती मिळाली नसल्याची तक्रार अपीलकर्ता श्री.सत्वशील धैर्यशील शेळके यांनी केली.

श्री.शेळके यांनी विविध स्वरूपाची व विविध प्राधिकारणांमधील माहिती एकत्रित स्वरूपात एका अर्जात मागितली होती. संबंधित कार्यालयांकडे अर्ज वर्ग केला व आपल्या कार्यालयाकडे उपलब्ध असलेली सर्व माहिती दिली, असे जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग-१, जिल्हा परिषद, सातारा श्री.बी.सी.पंधरे यांनी नमूद केले. अपीलकर्त्याची पोहोच असलेल्या पत्राची प्रत त्यांनी सादर केली. दुसऱ्या अर्जाद्वारे अधिकाऱ्यांच्या सेवापुस्तकाबाबतची माहिती श्री.शेळके यांनी मागितली होती. सेवापुस्तक आपल्या कार्यालयाकडे जमा झालेले नसल्यामुळे तसे कळविले, असेही श्री.पंधरे यांनी सांगितले.

अपीलकर्त्याने अनेक प्राधिकरणांकडील माहिती एकाच अर्जात मागितली असून 'ज्या त्या संकलनाकडे अथवा कार्यालयाकडे अर्ज हस्तांतरित करावा,' असे कळविले. अशा प्रकारे माहिती

मागण्याची अपीलकर्त्याची कृती योग्य नाही. अपीलकर्त्याने त्या त्या प्राधिकरणाकडेच अर्ज केला पाहिजे. एका अधिकाऱ्याच्या संदर्भातील १९ वर्षांची माहिती आयकर विवरणपत्रांच्या प्रतीसह अपीलकर्त्याने मागितली आहे. अशा प्रकारची माहिती कार्यालयात उपलब्ध नसल्याचे जन माहिती अधिकारी यांचे उत्तर आहे. अन्य व्यक्तीच्या-त्रयस्थ पक्षाच्या आयकर विवरणपत्राची प्रत अशा प्रकारे मागता येणार नाही. तथापि शासकीय अधिकारी म्हणून संबंधित अधिकाऱ्यांनी दाखल केलेल्या मालमत्ता विवरणपत्राची प्रत अपीलकर्त्यास देण्याचे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार पूर्तता केल्याचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग-१, जिल्हा परिषद, सातारा श्री.बी.सी.पंधरे यांनी दि.९.४.२०१० च्या पत्रान्वये आयोगाला सादर केला.

अपीलकर्ता माहितीच्या अधिकाराचा सातत्याने वापर करीत असूनही त्यांनी योग्य त्या प्राधिकरणाकडे प्रथम अपील केलेले नाही, हे लक्षात घेण्यासारखे आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
30 APR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ, पुणे यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधानभवनसमोर, पुणे ४११ ००१

श्री.रामचंद्र बाबुराव चौगुले ..... **अपीलकर्ता**
मु.पो.तळदंगे, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** अप्पर जिल्हाधिकारी, कोल्हापूर ..... **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** उपविभागीय अधिकरी, इचलकरंजी विभाग,
ता.इचलकरंजी, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९६३ / २००९ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दिनांक ७.४.२०१० |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.रामचंद्र बाबुराव चौगुले
मु.पो.तळदंगे, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी तथा** अप्पर जिल्हाधिकारी, कोल्हापूर, प्रतिनिधी श्री.विजयसिंह देशमुख

**जन माहिती अधिकारी तथा** उपविभागीय अधिकरी, इचलकरंजी विभाग,
ता.इचलकरंजी, जि.कोल्हापूर श्री.विजयसिंह देशमुख

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दिनांक १६.९.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दिनांक ५.१०.२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दिनांक १६.१०.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दिनांक १२.११.२००९ |
| ८ | मूळ माहिती अर्ज (जोडपत्र 'अ') ची प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अतिक्रमण प्रकरणात उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यंनी दिलेला निर्णय चुकीचा असून तो आपल्याला मान्य नाही. त्याबाबत फेरचौकशी व्हावी व हा निर्णय रद्द करावा, अशी आपली मागणी असल्याचे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.रामचंद्र बाबुराव चौगुले यांनी केले.

श्री.चौगुले यांचा मूळ अर्ज व प्रथम अपिलातही या स्वरूपाच्या मागण्या केल्या असून ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही, असे त्यांना वेळोवेळी स्पष्ट केले आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, इंचलकरंजी विभाग, इचलकरंजी, जि. कोल्हापूर श्री.विजयसिंह देशमुख यांनी केले.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
30 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. मोहन श्रीपाद घाटपांडे
मु.पो.बेल्हे, ता. जुन्नर, जि. पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर पोलीस अधीक्षक,
पुणे ग्रामीण, पाषाण, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा पोलीस निरीक्षक,
ओतूर पोलीस स्टेशन, ता. जुन्नर, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९६३ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | १०.३.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. मोहन श्रीपाद घाटपांडे
मु.पो.बेल्हे, ता. जुन्नर, जि. पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर पोलीस अधीक्षक,
पुणे ग्रामीण, पाषाण, पुणे श्री. रामनाथ पोकळे

**जन माहिती अधिकारी** तथा पोलीस निरीक्षक,
ओतूर पोलीस स्टेशन, ता. जुन्नर, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २७.१.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २८.१.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १४.३.२००८ |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २९.४.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

विवाहितेच्या छळाबाबत वृत्तपत्रात आलेल्या बातमीच्या अनुषंगाने मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा पोलिस निरीक्षक, ओतूर पोलीस स्टेशन यांनी दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. मोहन श्रीपाद घाटपांडे यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात केली आहे.

वृत्तपत्रातील बातमीवरून संबंधित विवाहितेचे नाव, पत्ता वगैरे तपशील अपीलकर्त्याने मागितला होता. त्यावेळी साखर कारखान्याच्या निवडणुकीच्या बंदोबस्तात कर्मचारी गुंतले असल्यामुळे माहिती त्वरित देता आली नाही. अपिलाच्या सुनावणीला अपीलकर्ता उपस्थित राहिले नाहीत. अपिलाच्या निर्णयासोबत टपालाने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी माहिती पाठविली, असे निवेदन विद्यमान जन माहिती अधिकारी तथा पोलिस निरीक्षक, ओतूर पोलिस स्टेशन यांनी केले.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा पोलिस निरीक्षक, ओतूर पोलीस स्टेशन श्री. एस.एस.डौले यांनी माहिती देण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा लेखी खुलासा आयोगाला सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार दि.२३.३.२०१० च्या पत्रान्वये श्री. डौले यांनी खुलासा सादर केला. बंदोबस्ताच्या कारणावरून माहिती देण्यास विलंब करता येणार नाही.

तसेच कनिष्ठ अधिकाऱ्याने वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे माहिती पाठविली व त्यांनी विलंबाने माहिती अपीलकर्त्यास पुरविली, अशा स्वरूपाची प्रक्रिया पोलिस विभागात अवलंबिली जात असल्याचे दिसून येते. श्री. डौले यांच्या खुलाशाप्रमाणे अन्य अपिलांमध्येही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत अशा प्रकारची प्रक्रिया मान्य करता येणार नाही. माहिती देण्याची जबाबदारी जन माहिती अधिकारी यांची आहे व त्यांनी ती विहित मुदतीत पार पाडली पाहिजे, याची समज सर्व संबंधितांना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. कनिष्ठ अधिकाऱ्याने वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे माहिती पाठविणे व त्यांनी (विलंबाने) माहिती अपीलकर्त्यास पुरविणे, अशा स्वरूपाची प्रक्रिया पोलिस विभागात अवलंबिली जात असल्याचे दिसते. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत अशी कार्यपध्दती नियमबाह्य ठरते. जन माहिती अधिकाऱ्यांनी विहित मुदतीत माहिती देणे व अपिलीय प्राधिकारी यांनी विहित मुदतीत अपिलाचा निर्णय देणे या अधिनियमानुसार बंधनकारक आहे, याची समज जिल्हा पोलिस अधीक्षक यांनी सर्व संबंधितांना कळवावी व कार्यपध्दती नियमानुसार करण्याची व्यवस्था ठेवून अनुपालन अहवाल दि. २६.४.२०१० पर्यंत आयोगाला सादर करावा.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. १५.४.२०१०

**प्रत :** जिल्हा पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण, पाषण यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी सादर.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. राजू बाळासो गोरे
मु.पो.हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रादेशिक परिवहन अधिकारी,
कोल्हापूर, जि. कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रभारी उप प्रादेशिक परिवहन
अधिकारी, कोल्हापूर जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९६४ /२००९/ कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | ७.४.२०१० |
| ३. | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रादेशिक परिवहन अधिकारी, कोल्हापूर, जि. कोल्हापूर डॉ. श्री. डी. टी. पवार<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा प्रभारी उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, कोल्हापूर जि. कोल्हापूर श्री. राजेंद्र मदने | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २१.७.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ७.८.२००९, १८.८.२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १४.९.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ७.१०.२००९ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

जन माहिती अधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, कोल्हापूर यांनी दिलेली माहिती अपुरी असल्यामुळे आपण पाच स्मरणपत्रे पाठवूनही योग्य व पूर्ण माहिती मिळाली नाही. अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक परिवहन अधिकारी, कोल्हापूर यांनी अपिलाची योग्य दखल घेतली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. राजू बाळासाहेब गोरे यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात केली आहे.

श्री. गोरे यांच्या दि. २१.७.२००९ च्या अर्जाला दि. ७.८.२००९ रोजी उत्तर पाठविले. विशिष्ट नमुन्यात व सरसकट माहिती मागितली असल्यामुळे तपशील स्पष्ट करण्यासाठी येण्यास त्यांना कळविले. त्यांच्याशी चर्चा झाल्यानंतर दि. १८.८.२००९ रोजी आपल्या कार्यालयाकडील माहिती त्यांना दिली. कोल्हापूरबरोबरच सांगली व सातारा येथील कार्यालयांबाबतचीही माहिती त्यांनी मागितली होती. ती मागवून देण्यास विलंब झाल्यामुळे दि. २२.९.२००९ रोजी नि:शुल्क पाठविली. त्यांनी मागणी केल्यानुसार विशिष्ट तक्त्यामध्ये माहिती देणे बंधनकारक नसतानाही त्या स्वरुपात संकलित करून माहिती दिली, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, कोल्हापूर श्री. राजेंद्र मदने व अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक परिवहन अधिकारी, कोल्हापूर डॉ. श्री. डी. टी.पवार यांनी पूरक कागदपत्रांसह केले.

विशिष्ट नमुन्यात व विविध ठिकाणची माहिती संकलित करून देण्याचे बंधन जन माहिती अधिकाऱ्यांवर नाही. तथापि जन माहिती अधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, कोल्हापूर यांनी अपीलकर्त्यास मागणीनुसार आपल्या कार्यालयातील माहितीबरोबरच अन्य कार्यालयांतील माहितीही संकलित करुन दिली असल्याचे उभय बाजूंनी सादर केलेल्या कागदपत्रांवरून दिसते.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

पुणे
दि. 30 APR 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.शशिकांत भिमराव जाधव
द्वारा श्री.प्रकाश बबन गवळी
१४६, गावठाण, ई वॉर्ड, लोणावळा, ता.मावळ, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुयाधिकारी,
लोणावळा नगरपरिषद, ता.मावळ, जि.पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक नगररचनाकार,
नगररचना विभाग, लोणावळा नगरपरिषद, ता.मावळ, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९६४ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.३.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी,
लोणावळा नगरपरिषद, ता.मावळ, जि.पुणे श्री.योगेश गोडसे

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक नगररचनाकार,
नगररचना विभाग, लोणावळा नगरपरिषद, ता.मावळ, जि.पुणे श्री.म.घ.ताराणी

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.५.३.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२८.३.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.३.४.३००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२८.४.२००८ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२५.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.१०.३.२०१० रोजी घेण्यात आली.

आरक्षित जागेच्या संदर्भात मालकी हक्काच्या अनुषंगाने अपीलकर्ता श्री.शशिकांत भिमराव जाधव यांनी मागितलेली माहित विहित मुदतीत देण्यात आली. त्याने समाधान न झाल्याने श्री.जाधव यांनी अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी, लोणावळा नगरपरिषद, ता.मावळ, जि.पुणे यांच्याकडे अपील केले. अनुषंगिक कागदपत्रे नि:शुल्क देण्याचा आदेश तत्कालीन अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिला. त्यानुसार ती माहितीही नि:शुल्क देण्यात आली. नगरपरिषदेच्या अभिलेखात उपलब्ध नसलेली अन्य माहिती देण्यात आली नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक नगररचनाकार, लोणावळा नगरपरिषद, ता.मावळ, जि.पुणे श्री.म.घ.ताराणी व अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी, लोणावळा नगरपरिषद, ता.मावळ, जि.पुणे श्री.योगेश गोडसे यांनी केले. उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता ते रास्त असल्याचे दिसते.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी योग्य कार्यवाही केली आहे. मात्र मूळ अर्जानुसार उत्तर नेमकेपणाने देण्याची समज जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक नगररचनाकार, लोणावळा नगरपरिषद, ता.मावळ, जि.पुणे श्री.म.घ.ताराणी यांना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**पुणे**
**दि.२६.४.२०१०**